लोकसत्ता

# महाराष्ट्रातील १६ चित्रपटांचा वूडपेकर महोत्सवात समावेश

प्रतिनिधी, पुणे



**नवी दिल्ली** येथे ११ ते १३ डिसेंबर या काळात होणाऱ्या वूडपेकर चित्रपट महोत्सवात महाराष्ट्रातील १६ चित्रपटांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात मुंबईतील ९, पुण्यातील ४, तर सातारा, सांगली, ठाणे येथील प्रत्येकी एका चित्रपटाचा समावेश आहे. हा महोत्सव दुसऱ्यांदा होत आहे. तो दिल्लीतील इंडिया हॅबिटाट सेंटर मध्ये होणार आहे. त्यात पर्यावरण, धर्म आणि संस्कृती, वने आणि वन्यजीव, रोजगार, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, विद्यार्थी अशा विविध विषयांचा समावेश आहे. १६ शहरांमधील ५ चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातील संयोग मोहिते, संदीप माने, रीतेश शर्मा, अशोक पटेल, अनिल सोनावणे, कविता दातीर आदींचे चित्रपट दाखवले जाणार आहेत.